# माहेरची ओढ

"घाल घाल पिंगा वाऱ्या माझ्या परसात
माहेरी जा सुवासाची कर बरसात ",

आपले बालपण जिथे गेले ती जागा, तो गांव, तेथील वातावरण रंध्रा-रंध्रात भिनलेले असल्यामुळे आयुष्यभर विसरता येत नाही. आम्हां स्त्रियांना तर ही माहेरची ओढ विशेषत्वाने जाणवते. विवाहानंतर सांसारिक जबाबदाऱ्या पेलताना आणि पार पाडताना मन कितीही गुंतून गेले, तरी बालपण व्यतित झालेल्या गावाची आठवण वेळोवेळी मनाला माहेरची ओढ लावतेच, कालांतराने ही जाणीव बोथट न होता तीव्रच होत जाते.

मी मुरुडच्या केतकरांची लेक. बालपण मुरुडसारख्या शांत व निसर्गसंपन्न गांवात काही काळ रमून गेले. विवाहानंतर माझे इंजिनिअर पती श्री. अरविंद यांच्या सोबत अमेरिकेत जावे लागले. आपला देश, जन्मभूमी, भाषा, संस्कृती सर्वच बाबतीत पूर्व-पश्चिम अंतर. एकमेकांच्या साथीने समृद्धीचे टप्पे ओलांडीत अमेरिकेतील आर्थिक आणि भौतिक समृद्ध जीवनाशी एकरूप होऊन गेलो. नागरिकत्त्वही अमेरिकेचे. शरीराने आणि कायद्याने अमेरिकन झाले तरी एवढ्या कालप्रवासात भारताची आणि त्यातील जन्मभूमी मुरुडची आठवण जराही पुसट होऊ शकली नाही.

आता तीन मुलगे येथे वैद्यकीय व्यवसायात स्थिरावल्यानंतर सांसारिक जबाबदारीतून तर पार पडले पण मोकळ्या झालेल्या मनात, इतका काळ काहीशा दडपणाखाली असलेली 'माहेरची ओढ' एकदम उफाळून आली. आईपासून ताटातूट झालेल्या बालकासारखीच मनाची अवस्था झाली आणि ओढाळ मनानें माझ्या शरीराला सातासमुद्रापलिकडच्या मुरुडला आणून सोडले. इथे एक घरकुल बांधून त्यातील जमिनीवर जेव्हां बसले तेव्हां आईच्या मांडीवर बसल्याचा, कितीतरी वर्षांनी माहेरी आल्याचा आनंद झाला.

हा आनंद थोडा निवळल्यावर गावातील आजूबाजूच्या परिसराकडे लक्ष गेले आणि बालपणी अनुभवलेल्या गावातील वातावरणातील बदलाच्या पाऊलखुणा पाहून मनात एक अनामिक कातरता निर्माण झाली. मोकळी हवा, भरपूर पाणी आणि शांत

व निसर्गरम्य परिसर यामुळे वस्तीसाठी इतर भागातील लोकांचे लक्ष कोकणाकडे वेधू लागले आहे. त्याचप्रमाणे नैसर्गिक साधनसंपत्ती व मागास भागाला मिळणारे सरकारी फायदे यांमुळे काही कारखानेही कोकणात येऊ लागले आहेत. हे एक प्रकारचे आक्रमणच आहे.

बाहेरून येणाऱ्या लोकांना गावाच्या परंपरेचा किंवा इतिहासाचा अभिमान असणे अशक्यच. त्यामुळे गांवाच्या सामाजिक ऐक्याला तडे जाण्याचा संभव आहेच पण त्याबरोबरच अनिष्ट, समाजविघातक प्रवृत्तींचा शिरकावही होऊ शकतो.

ही कालसापेक्ष आक्रमणे आपण थांबवू शकत नाही ही गोष्ट खरीच. तरीही 'दगडापेक्ष वीट मऊ' या न्यायाने स्थानिकांना त्यातून काही लाभ मिळू शकेल का याचा विचार केला पाहिजे. अर्थात हा विचार व्यक्तिगत न होता समष्टिदृष्ट्या झाला पाहिजे. ग्रामस्थांनी, बाहेरून येणाऱ्यांसाठी - मग ती व्यक्ती असो, वा उद्योग - सामाजिक स्वास्थाच्या दृष्टीने काही अटी घातल्या पाहिजेत.

समृद्ध आणि अभिमानास्पद परंपरा लाभलेल्या आपल्या गावाचा विकास होताना स्वास्थ्य आणि निसर्गसौंदर्य या मूलभूत गोष्टींना गालबोट लागणार नाही ना याची काळजी सर्वांनी एकजुटीने आणि जबाबदारीने घेतली पाहिजे.

अशाप्रकारे, सिद्धपुरुषाने वसविलेल्या आणि श्री दुर्गामातेचा वरदहस्त लाभलेल्या मुरुडचा निकोप विकास आणि भरभराट व्हावी आणि माझ्यासारख्या जगभर विखुरल्या गेलेल्या मुरुडकरांना गांवात आल्यावर माहेरी आल्याचा आनंद प्राप्त व्हावा, ही श्रीचरणीं प्रार्थना!

- सौ. सविता अरविंद गोखले,
४२, स्प्रुस ॲव्हेन्यू, एमर्सन, NJ. 07630, अमेरिका.
(पूर्वाश्रमाची सुधा केतकर, मुरुड.)
savargo@msn.com

****************

(भिसे, कारखानीस कुटुंबीय आणि "मायबोलीचा विश्वसेतू" च्या सह-संपादकांच्या परवानगीने "मायबोलीचा विश्वसेतू" या पुस्तकातून)